

१६ ते ३१ जुलै २०१८ । किंमत २५ रु.
(एकूण पृष्ठे ६८)
परिवर्तनाचा
वाटसरू

मुखपृष्ठावरील छायाचित्र
प्रियांका सातपुते

परिवर्तनाचा
वाटसरू

वर्ष १८ वे / अंक ६ वा
किं. २५ रु. / १६ ते ३१ जुलै २०१८

ISSN: 2250-3145

संपादक
अभय कांता*
शरद नांवरे
प्रज्ञा दया पवार
सुरेंद्र जोंधळे

कार्यकारी संपादक
देवेंद्र इंगळे

संपादक मंडळ
दिलीप चव्हाण, माधुरी दीक्षित, नारायण भोसले, मिलिंद किर्ती, वृषाली मगदूम, प्रज्वला तट्टे, कलीम अजीम, अनिल जायभाये

सहव्यवस्थापक
दीपक कसाळे

संपर्क पत्ता
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ७७७६९०२२६७
इमेल : pwatsaru@yahoo.com
वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिक : ३,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. ३५० रु., सॉफ्ट + छापील ६५० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.
बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी



10/09/18

परिवर्तनाचा

# वाटसरु

## अनुक्रम


**इपीडब्ल्यूची पानं**

निष्प्रभ यूजीसीच्या दिशेनं ५
'वेतनपट' आकडेवारीचा अर्थ लावताना ७
कार्यरत, परंतु अपूर्ण ९
लोकशाही ते झुंडशाही १०
'बस्तरिया बटालियन' १२

**समसामायिक**

आम्ही ती स्मशाने ज्यांना १५
विनायक लष्कर

म्हणणे ऐका मूकजनांचे! १७
झैद रआद अल हुसेन
अनु. सुकुमार शिदोरे

हरियाणवी पोलीसांच्या 'गाय पे हत्या' १९
नेहा दीक्षित अनु. स्वातीजा मनोरमा


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**विशेष लेख**

वसाहतपूर्व जातिसमाजातील प्रेम ३१
उमेश बगाडे

**'अर्था'र्थ**

युबीआय : भांडवलशाहीचा नवीन चकवा ३९
संजीव चांदोरकर

**ऊर्जायन**

भांडवली विकास आणि ऊर्जा क्षेत्र ४६
संजय मं. गो.

**कला**

सत्यशोधकी फोटो संमेलन! ५१
प्रतिमा परदेशी

**आदरांजली**

मानवतावादी कवी : केदारनाथ सिंह ५५
गिरीश काशिद

**कविता**

किरण शिवहर डोंगरदिवे ६१
लखनसिंह कटरे ६२
दीपक बोरगावे ६२

**पुस्तक ओळख**

नकार, वेदना व विद्रोहाकडून 'अस्वस्थते'कडे ६३
संजयकुमार कांबळे

**आदरांजली**

# मानवतावादी कवी : केदारनाथ सिंह

गिरीश काशिद

हिंदी साहित्यात प्रयोगवादी कवितेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. हिंदी नवकवितेच्या विकासात या कवितेने महत्त्वाचे योगदान दिले आहे. कवी अज्ञेय यांना प्रयोगवादी कवितेचे प्रवर्तक मानले जाते. त्यांनी आपल्या कवितेतून प्रयोगवादी कवितेचा पुरस्कारच केला नाही तर अशा कविता लिहिणाऱ्या कवींनाही मंच उपलब्ध करून दिले. या अनुषंगाने त्यांनी 'तारसप्तक' या नावाने तीन खंड प्रकाशित केले. प्रत्येक खंडात हिंदी भाषेतील सात नवोदित कवींचा समावेश केला. या मालिकेतील तिसऱ्या सप्तकामधील एक महत्त्वाचे कवी म्हणून केदारनाथ सिंह सर्वपरिचित आहेत. सप्तक प्रसिद्ध होत असतानाचा त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला.

केदारनाथ सिंह यांचा जन्म १९३४ साली उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातील चकिया गावात झाला. त्यांनी बनारस विद्यापीठातून एम. ए., पीएच. डी.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी विविध महाविद्यालयांतून हिंदीचे प्राध्यापक म्हणून सेवा केली. पुढे ते गोरखपूर विद्यापीठात आले व शेवटी १९७६मध्ये जवाहरलाल नेहरू विद्यापीठात प्राध्यापक बनले व तेथूनच सेवानिवृत्त झाले. ते नोकरीच्या निमित्ताने शहरात आले पण ते कधी नगरीय वा मध्यमवर्गीय मानसिकतेचे शिकार बनले नाहीत. त्यांच्या मनातील गाव कायम जिवंत राहिले. त्यांच्या व्यक्तित्वावर अखेरपर्यंत ग्रामीण जीवनाचा स्पष्ट प्रभाव पहावयास मिळाला. साधी राहणी व देशी जीवन-शैली ही त्यांची सुरुवातीपासूनची ओळख त्यांनी कायम ठेवली. प्रचार व प्रदर्शन यापासून ते कायम दूर राहिले. त्यांचा स्वभाव सौम्य पण सत्यवादी होता. लालसा व महत्त्वाकांक्षा यांना त्यांनी आपल्या जीवनात कधी थारा दिला नाही. त्यांचे संयत विचार केवळ कवितेतच नाहीत तर जीवनातही दिसून येतात. मध्यंतरी देशात जो भाषिक वादाचा मुद्दा समोर आला त्यावेळी ते राधाकृष्णन यांच्या उक्तीचा संदर्भ देत म्हणाले, भारतीय साहित्य एक आहे जे अनेक भाषांतून लिहिले जाते. ते देशातील विविधतेप्रमाणे भाषिक विविधता स्वीकार करत. त्यांच्या मते भाषा ही कोणावर लादली जाऊ शकत नाही. केदारनाथ सिंह यांनी आपल्या काव्ययात्रेचा दीर्घ प्रवास पूर्ण केला आहे. पण सुरुवातीपासून त्यांची नाळ देशी माती व जाणीवांशी घट्ट जोडलेली आहे. आपल्या मूळ

लेखक बार्शी (जि.सोलापूर) येथे एस.बी.झाडबुके महाविद्यालयात हिंदीचे प्राध्यापक व विभागप्रमुख आहेत.
ईमेल girishkashid7@gmail.com

कि राज नहीं भाषा

भाषा सिर्फ भाषा रहने दो/ मेरी भाषा को।'

त्यांच्या कवितामध्ये समाज व्यवहारातील साधारण व उपेक्षित शब्द सार्थक बनताना दिसतात. भाषेच्या संदर्भातील काही श्रेष्ठ कविता त्यांनी लिहिल्या आहेत. ते हिंदीला आपला देश मानतात, तर भोजपुरी भाषेला घर. ते संपूर्ण जगात बोलल्या जाणाऱ्या हिंदीचे स्वप्न पाहतात. त्यांच्या कवितेची शैली शेतकऱ्यांच्या गप्पांची शैली आहे. ती सहज व सामान्य रूपाने प्रगल्भ बनत जाते. ते याद्वारे लोकजीवनातील विडंबनाचेही वर्णन करतात. यासाठी ते लोकप्रतिमा व लोकभाषेचा सम्यक प्रयोग करतात. विस्मृत संदर्भाना संकेताने अर्थ देतात.

केदारनाथ सिंह प्रतिमाधर्मी कवी आहेत. ते प्रतिमेशिवाय कवितेची कल्पनाच करू शकत नाहीत. हे त्यांच्या कवितेचे सामर्थ्य आहे. पण यामुळे त्यांची कविता सामान्य वाचकांना अवघडही वाटते. समीक्षक त्यांच्यावर यामुळे कलाप्रियतेचा आरोप करतात. केदारनाथ सिंह यांच्या कवितेत गाव आणि शहराचा समन्वय दिसून येतो. केदारनाथ सिंह हे दुर्दम्य आशावादी कवी आहेत. ते निराशेतही आशेचा किरण शोधतात. त्यांची कविता ही जीवनाच्या स्वीकृतीची कविता आहे. त्यांच्या कवितेत भारतीय समाजाच्या प्रती घनिष्ट संवेदना व जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आहे. ते आपल्या कवितामधून जीवनातील मानवतेचा शोध घेतात. त्यांच्या कवितेत प्रश्नाकुलता, अध्यात्मिकता व भाषिक संदर्भ उत्कटतेने साकार होतात. त्यांच्या कवितेची शैली विनम्र व आत्मीय आहे. त्यात करूणेचा अंश आहे. यामुळेच त्यांच्या प्रत्येक काव्यसंग्रहात बुद्धावर कविता मिळते. त्यांच्या कवितेत बुद्धाच्या करुणेबरोबर कबीरांची आक्रमकताही आहे. या दोहोतून त्यांची काव्य संवेदना तयार झाली आहे. त्यांच्या कवितेत सामान्य संदर्भही विशिष्ट अर्थ प्राप्त करताना दिसतात. त्यांच्या कवितेत चित्रात्मकता व ध्वन्यात्मकता आहे. यामुळेच त्यांच्या कवितेत घटनांचे वर्णन नाही तर चित्रण मिळते. त्यांच्या कवितेत जीवनाचे कोरे चित्रण नाही तर जीवनाची स्थापना आहे. त्यांच्या कवितेचे नाते मूल्य, सभ्यता व संस्कृतीशी आहे. ते आधुनिकतेचाही पुरस्कार करतात व स्वस्थ परंपरांचा सम्मानही करतात. त्यांनी आपल्या कवितेद्वारे भारतातील देशीय आधुनिकतेचे अन्वेषण केले आहे. ज्यातून मानवीयता, निसर्ग, नवउदारवाद, जागतिकीकरण याविषयी विचार व्यक्त केले आहेत. त्यांची कविता व्यापक मानवतेचा विचार समोर ठेवते. या कवितेत जीवनातील उत्सव व मानवीय त्रासदी या दोहोंचे वर्णन मिळते. यामुळेच केदारनाथ सिंह स्वत:ला जीवन रागाचे कवी मानतात, जे यथोचित आहे.

कवी केदारनाथ सिंह यांना त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल मैथिलीशरण गुप्त सन्मान, कुमारन आशान पुरस्कार, जीवन भारती सम्मान, दिनकर पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, व्यास सम्मान, साहित्य अकादमी फेलो इ. अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. ते हिंदी साहित्यातील एक महत्त्वाचे कवी आहेत. सन २०१३चा ४९वा भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना मिळणे हे त्याचे द्योतक आहे. हिंदीतील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करणारे ते दहावे साहित्यिक होते. १९ मार्च २०१८ रोजी कवी केदारनाथ सिंह यांनी इहलोकाची यात्रा संपविली. हिंदी कवितेतील भरीव योगदानामुळे ते साहित्य जगतात अमर राहतील यात तीळमात्रही शंका नाही.

●

परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मुंबईत मिळण्याचे ठिकाण

पीपल्स बुक हाऊस

मेहेर कॉम्प्लेक्स, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई
४००००१